**शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर**

जयवंत प्रतिष्ठान संचलित

## आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा

**ता.जावली,जि. सातारा**

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

### अहवाल २०२३ – २०२४

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत खालीलप्रमाणे नियमित कार्यक्रम घेण्यात आले.

1) ग्रामपरी एम.आर.ए.सेंटर, पाचगणी येथे दि.१९ व २० एप्रिल,२०२३ रोजी एक दिवसीय निवासी युवा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या युवा मेळाव्यास महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील एकूण २४ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता.

2) शनिवार दि.६ मे २०२३ सकाळी १०.०० वा. 'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सांगता व कृतज्ञता पर्व २०२३' उपक्रम प्राचार्य मेजर डॉ.अशोक व्ही.गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.प्रमोद घाटगे यांच्या हस्ते लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच १०० सेकंद स्तब्धता व मौन पाळून आदरांजली अर्पण करण्यात आली. सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व १०० विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

3) दि.१७/०५/२०२३ रोजी ग्रामीण रुग्णालय, मेढा रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने 'एच.आय.व्ही./एड्स तपासणी शिबीर'संपन्न झाले ७० विद्यार्थी- विद्यार्थीनी, ६ शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

4) दि.५/०६/२०२३ रोजी आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनानिमित्त प्लास्टिक मुक्त परिसर अभियान अंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरातील प्लास्टिक गोळा करण्यात येऊन महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्यात आला. महाविद्यालयातील ३० विद्यार्थी- विद्यार्थिनी सहभागी झाले होते. तर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय भोसले, डॉ. उदय पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

5) दि.१७/०७/२०२३ रोजी आझादी का अमृत महोत्सव उपक्रमाअंतर्गत महाविद्यालय परिसरात ५० वृक्ष लागवड करण्यात आले.

6) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे दि.९ ते १५ ऑगस्ट २०२३ निवासी शिबिरात २ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

7) दि.१२/८/२०२३ रोजी रेड रिबन क्लब अंतर्गत एच.आय.व्ही./एड्स जाणीव जागृती ऑनलाईन कार्यक्रमात १०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

8) दि.१३/०८/२०२३ व दि.१४/०८/२०२३ रोजी आझादी का अमृतमहोत्सव उपक्रमांतर्गत महाविद्यालयात मा.प्राचार्य यांचे हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.

9) दि.१४/०८/२०२३ रोजी ७७ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त महाविद्यालय परिसरात स्वच्छता करण्यात आली.या उपक्रमात १०० स्वयंसेवक व २ शिक्षक सहभागी झाले होते.

10) दि.१५/०८/२०२३ रोजी आझादी का अमृतमहोत्सव उपक्रमांतर्गत महाविद्यालयात मा.प्राचार्य यांचे हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.यावेळी उपप्राचार्य डॉ.प्रमोद घाटगे,सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी,१०० विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

11) दि. ०४/०९/२०२३ रोजी ग्रामीण रुग्णालय मेढा रेड रिबन क्लब उपक्रमांतर्गत एच.आय.व्ही.एड्स जाणीव जागृती करिता QR कोड महाविद्यालय परिसरात लावण्यात आला स्वयंसेवकांनी कोड मधून एच.आय.व्ही.एड्स जाणीव जागृतीची माहिती घेतली.

१२) ०६/०९/२०२३ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती (५ सप्टेंबर) साजरा करण्यात आली. तसेच शिक्षक दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयात विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अध्यापन करून अध्यापनाचा अनुभव घेतला या कार्यक्रमास १०० स्वयंसेवक,सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

१३) दि.१५/०९/२०२३ रोजी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित NRD/SRD व प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन निवड चाचणीस दोन स्वयंसेवक सहभागी झाले

१४) दि.१९/०९/२०२३ रोजी गणेशोत्सव २०२३ साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत संगीत खुर्ची, पारंपारिक खेळ फुगडी,झिम्मा,गर्भा इ. घेण्यात आले.तसेच माजी विद्यार्थी मेळावा व गणेश पूजा व फणी गेम्स घेण्यात आल्या. निर्माल्य संकलन करून त्याचा कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करण्यात आला.

१५) दि.२६/०९/२०२३रोजी माझी माती माझा देश अभियानाअंतर्गत भारताच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना नमन करण्यासाठी “मेरी माटी,मेरा देश” अभियान महाविद्यालयात घेण्यात आले. महाविद्यालयातील अमृत कलश मध्ये सर्व विद्यार्थ्यांनी आपआपल्या गावातून आणलेली माती संकलीत करण्यात आली व अमृत कलशामध्ये माती टाकत असतानाचा सेल्फी फोटो शासनाच्या QR कोडवर अपलोड करण्यात आला.

१६ ) दि.१ ऑक्टोबर,२०२३ रोजी स्वच्छता ही सेवा उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरात ‘एक तास स्वच्छता’ करण्यात आली.या उपक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ.अशोक गिरी, उपप्राचार्य डॉ.प्रमोद घाटगे,महाविद्यालयातील १०० स्वयंसेवक सहभागी झले होते.

१७) दि.२ ऑक्टोबर २०२३ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहाददूर शास्त्री जयंतीनिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ.अशोक गिरी याचे हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या वेळी उपप्राचार्य डॉ.प्रमोद घाटगे सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.